## कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य वनधोरण २००८

([illegible])

योजना कालावधी    सन २००९-१० ते २०१३-१४

[illegible]

## कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर

## महाराष्ट्र राज्य वन धोरण २००८

## ३३% वृक्षव्याप्तीची योजना

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ ते ३ |
| २ | सामाजिक व आर्थिक समालोचन | ४ ते ८ |
| ३ | कोल्हापूर जिल्ह्याचे वनक्षेत्र | ९ |
| ४ | कृती नियोजन आराखडा | १० |
| ५ | तालुका निहाय उपलब्ध वनेत्तर क्षेत्र | ११ |
| ६ | प्रस्तावित वनीकरणाची विगतवारी | १२ |
| ७ | वृक्ष लागवडीसाठी अंदाजित खर्च | १३ |
| ८ | कार्यकारी यंत्रणा | १४ |
| ९ | वर्षवार वनीकरणाची व खर्चाची विगतवारी | १५ व १६ |
| १० | नमुना हस्तपत्रक | १७ व १८ |
| ११ | प्रस्तावित क्षेत्राचे नमुना फोटोग्राफ्स | १९ व २० |
| १२ | जिल्ह्याचा नकाशा | २१ |

# कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर

## महाराष्ट्र राज्य वनधोरण २००८

### प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील अधिकाधिक क्षेत्रावर घ्यावयाच्या वृक्षलागवड कार्यक्रमाचे सनियंत्रण करण्यासाठी शा. नि. क्र. एफडीएम-२००५/प्र.क्र.१२५/फ-२ दि. २२/११/२००५ अन्वये राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली आहे. विविध शासकीय विभागाचे प्रमुख हे सदस्य असून संचालक, सामाजिक वनीकरण म.रा. पुणे हे सदस्य सचिव आहेत.

केंद्र शासनाने सन २००७ पर्यंत २५% व सन २०१० पर्यंत ३३% क्षेत्र वनाखाली आणण्याबाबत निर्देश दिले आहेत. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रत्येक राज्यातून वनक्षेत्राबरोबरच वनेतर क्षेत्रावरही वनीकरणाचे कार्यक्रम राबविणे आवश्यक असून यासाठी शासकीय तसेच अशासकीय संस्थाच्या माध्यमातून सर्व स्तरावर प्रयत्न करावे लागणार आहेत. भूपृष्ठावरील वनाच्छादन वाढविण्यासाठी खाजगी जमिनीवर तसेच वनेतर जमिनीवरही मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे.

### राज्यवननिती

राष्ट्रीय वननिती १९८८ नुसार राज्यातील वनांचा विकास करण्यासाठी वनाच्छादित जमिनीचे प्रमाण ३३ % पर्यंत वाढविण्यासाठी केंद्र शासनामार्फत ठोस कृति कार्यक्रम ठरविण्यात आला आहे. त्यानुसार प्रत्येक राज्यातील वनेतर पडीत क्षेत्रासह वन जमिनीवरील वनाखालील क्षेत्र टप्याटप्याने वाढवून ते ३३% पर्यंत आणण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयातून वनक्षेत्राबरोबरच वनेतर क्षेत्राचा समावेश करुन कृति व्यवस्थापन आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्याची नैसर्गिक साधन संपत्ती विचारात घेता राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३०७७१३ चौ.कि.मी. असून त्यापैकी ६३८७४ चौ.कि.मी. वनक्षेत्र आहे. राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राचा विचार करता ते २०.७६% इतके होते. राष्ट्रीय वननिती १९८८ नुसार महाराष्ट्रातील वनक्षेत्राचे प्रमाण कमी असल्यामुळे राज्याचा बराचसा भाग अवर्षणग्रस्त झाला आहे. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत आहे. याचा परिणाम पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे, दुष्काळ पडणे, पिक न येणे यासारख्या समस्याही आता तीव्र होऊ लागल्या आहेत. पावसाच्या कमतरतेमुळे पडित-अवतन क्षेत्र मोठया प्रमाणावर निर्माण झाले आहे. या जमिनीचा योग्य वापर होत नसल्यामुळे राज्यातील लाकुड उत्पादन दरवर्षी ०.२१ घ.मी. प्रतिहेक्टर इतके आहे. हे प्रमाण देशाच्या तुलनेत ०.५ घ.मी. प्रतिहेक्टर प्रतिवर्ष इतके अल्प आहे. महाराष्ट्र राज्यात ९.१०% घरगुति वापरासाठी, ११.६८% जळाऊ लाकडासाठी, १७.५०% वैरण व चारा यासाठी, ३.४% इमारती लाकडासाठी, व ११.५०% औद्योगिक वापरासाठी लाकुड पुरवठा जंगलातून होतो. सध्याच्या मागणीपेक्षा लाकुड पुरवठा खुपच कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे अवैध वृक्षतोडीचे प्रमाण वाढून त्याचा

शासकीय वनांवर ताण येऊ लागला आहे. मागणीप्रमाणे पुरवठा वाढविणे आवश्यक आहे. तसेच जंगलाचा होणारा ऱ्हास थांबविणे गरजेचे आहे. यासाठी राष्ट्रीय वननीती १९८८ नुसार भौगोलिक क्षेत्राच्या 33% इतके क्षेत्र वृक्षाच्छादनाखाली असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात असलेली वनांच्या अस्तित्वाची विषमता व त्यावर वाढणारा जैविक ताण यामुळे वनाखालील क्षेत्र निकृष्ट दर्जाचे व पडित होण्याची भिती नर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत आपल्या वनस्त्रोताच्या उत्पन्नात वाढ करणे याबरोबरच नैसर्गिक जंगलातील समृध्द अशी जैवविविधता जतन करणे व वनांचे संगोपन आणि संरक्षण करणे यासाठी महाराष्ट्र राज्याचे वनधोरण २००८ यास महाराष्ट्र शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे.

शासन निर्णय क्र. टिआरएस-१०९८/प्र.क्र.१९०/फ-६ दि. २२/९/२००८ अनुसार अंमलात आणलेल्या महाराष्ट्र राज्याचे वनधोरण २००८ यातील प्राथमिक उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. परिस्थितीकीय समतोल टिकून राहण्यास आणि पर्यावरणीय स्थैर्य अबाधित राहण्यास, नैसर्गिक आणि मानव निर्मित वनांचे पुरेशा शास्त्रशुध्द व्यवस्थापन तंत्राचा वापर करुन त्यांचे संवर्धन आणि शाश्वत विकास घडवून आणणे.
२. सर्व पडित, निकृष्ट आणि अनुत्पादक जमिनीचे जल व मृद संधारण होण्यासाठी पाणलोटक्षेत्र निहाय पुनर्वनीकरण करणे.
३. सामाजिक वानिकी व कृषि वानिकी व्दारे जनतेला व विशेषकरून भूमीहीन व दुर्बलगट तसेच स्त्रिया यांना सहभागी करून सर्व उपलब्ध सरकारी,सामूहिक व खाजगी जमीनीवरील वनव्याप्ती मोठया प्रमाणात वाढविणे.
४. पूर आणि दुष्काळ यावर मात करण्यासाठी तसेच जलाशयाचे गाळ भरण्यापासून वाचविण्यसाठी जल व मृद संधारण कामाव्दारे नद्या, तलाव आणि जलाशयाच्या पाणलोट क्षेत्राची होणारी जमीनीची धुप थांबवून असे क्षेत्र पडीक होण्यापासून वाचविणे.
५. वनजमिनीची व वनांतील वृक्षांची उत्पादन क्षमता वाढविणे.
६. ग्रामिण क्षेत्रातील गरीबांची आणि आदिवासींच्या जळावू लाकडाबाबत चाऱ्याबाबत,अकाष्ट वनोपजाबाबत असलेल्या मूलभूत गरजा भागविणे आणि या वनोपजांच्या मागणी आणि पूरवठयामधील तूट कमी करणे.
७. लाकूड व लाकडाची उत्पादने यास पर्यायी वस्तूचा वापर जास्तीत जास्त वाढवून व उपलब्ध वनउपजांच्या योग्य वापराला उत्तेजन देवून वनांवरील जौविक भार कमी करणे.
८. दिर्घकालीन योजना व कृती कार्यक्रम बनवून वन्यजीव व जैवविविधतेचे संरक्षण व विकास कामे केली जातील.

कार्यप्रणाली (Working Stragies)

१. राज्यातील ३३ टक्के भौगोलिक क्षेत्र वृक्षांच्या व्याप्तीखाली आणणेचा प्रयत्न राज्यशासनातर्फे केला जाईल, जे राष्ट्रीय वनधोरण १९८८ च्या उद्दिष्टानुसार असेल, ३३ टक्के वृक्षव्याप्तीचे उद्दिष्ट साध्य करणेसाठी जिल्हावार योजना बनविणे.
२. सामाजिक/सामुहिक वानिकी मार्फत वनीकरण कामे.

# कोल्हापूर जिल्हा

## सामाजिक व आर्थिक समालोचन सन २००४-२००५

१) पार्श्वभूमी :-

करवीर नगरीत तसेच कोल्हापूर जिल्हयास प्राचीन काळापासून ऐतिहासिक परंपरा आहे. ऐतिहासीकक परंपरेची साक्ष देणारी अनेक स्मारके व शिल्पे आजही अस्तित्वात आहेत. शिवशाहीच्या काळात कोल्हापूर हे संस्थान होते. तथापि सन १९४९ मध्ये सदर संस्थान भूतपूर्व मुंबई राज्यात विलीन झाल्यांनतर आजच्या कोल्हापूर जिल्हा अस्तित्वात आली. तसेच कोल्हापूरलर दक्षिण काशी म्हाणून ओळखले जाते.

३. स्थान :-

कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेकडील नैऋत्य पठारी भागावर उत्तर अक्षांशावर १५ अंश ते १७ अंश व पुर्व रेखांशावर ७३ ते ७४ अशांवर वसला असून जिल्हयाच्या पश्चिमेस सह्याद्रीचा कडा, उत्तरेस वारणा नदी, पुर्वेस अंशतः कृष्णा नदी व दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगांव जिल्हा अशा चतुःसिगा आहेत. जिल्हयातील बहुतांशी भागाची समुद्र सपाटीपासून उंची ३९० ते ६०० मीटर इतकी आहे.

४. भूप्रदेश भूस्तरीय संरचना :-

जिल्हयाचे प्रामुख्याने तीन भूभाग पडतात. पश्चिम भागामध्ये डोंगराळ तांबडया मातीचा भूप्रदेश, मध्य भागात सुपीक गाळाच्या जमिनीचा भूप्रदेश व पूर्व भागात मध्यम व काळ्या मातीचा भूप्रदेश येतो. पश्चिम भागात शाहूवाडी, बावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा व चंदगड हे तालुके मध्य भागात करवीर, कागल तर पूर्व भागात हातकणंगले व शिरोळ हे तालुके येतात. भोगावती, कुंभी, कासारी, पंचगंगा, हिरण्यकेशी व वेदगंगा या नद्यांच्या काठाची जमीन सुपीक व गाळाची आहे.

५. व्याप्ती :-

सिंधुदुर्ग जिल्हयाची निर्मिती झाल्यानंतर कोल्हापूर जिल्हयाचे सन १९८१ च्या जनगणने नुसार असलेल्या ९०४५ चौ.कि.मी. क्षेत्रफळामध्ये घट होऊन ते ७७४६ चौ.कि.मी. इतके झाले. सदर क्षेत्रफळ राज्याच्या क्षेत्रफळाच्या २.५ टक्के असून क्षेत्र फळाच्या दृष्टीने कोल्हापूर जिल्हयाचा राज्यात २४ वा क्रमांक आहे.

६. धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटन केंद्रे :-

कोल्हापूर येथे श्री महालक्ष्मीचे अतिप्राचीन मंदीर असून अव्दितीय शिल्प सौंदर्याने नटलेले आहे. सदरचे ठिकाण कोटयावधी भाविकांचे श्रध्दास्थान असून तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता पावलेले आहे. म्हणून या क्षेत्रास दक्षिण काशी असे संबोधले जाते. त्याच प्रमाणे पन्हाळा तालुक्यामध्ये जोतीबा आणि शाहूवाडी तालुक्यात विशाळगड व शिरोळ तालुक्यातील नृसिंहवाडी येथील दत्तमंदीर ही तीर्थक्षेत्रे प्रसिध्द आहेत. मौजे कुंभोज, तालुका हातकणंगले येथे बाहूबली हे जैनधर्मियांचे पवित्र तिर्थस्थान आहे. कर्नाटक महाराष्ट्र सिमेवर कृष्णा नदीच्या काठावर खिद्रापूर येथे महादेवाचे अतिप्राचीन मंदिर असून शिल्प सौंदर्याचा उत्कृष्ट नमुना आहे. जिल्हयातील पन्हाळागड, भुदरगड व सामानगड येथील ऐतिहासिक किल्ले तसेच कोल्हापूर येथील जुनाराजवाडा व

वस्तुसंग्रहालय ही मराठयांच्या इतिहासाचे दर्शन घडवितात. पन्हाळा हे थंड हवेचे ठिकाण व पर्यटन स्थळ म्हणून विकसित झालेले आहे. दाजीपूर येथील गवा अभयारण्य प्रसिध्द पावले आहे.

६) नद्या :-

जिल्हयातून प्रामुख्याने कृष्णा, वारणा, पंचगंगा, दूधगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी व घटप्रभा या नद्या वहातात. कृष्णा नदी जिल्हयाच्या ईशान्यपूर्व सिमेवरुन तर वारणा, पंचगंगा, दूधगंगा आणि हिरण्यकेशी या नद्या वायव्येकडून आग्नेकडून वाहतात. वारणा नदी सांगली व कोल्हापूर जिल्हयाच्या सीमेवरुन १२० कि.मी. वाहते.

जिल्हयातील कासारी, कुंभी, तुळशी व भोगावती या उपनद्या पंचगंगा नदीस मिळाल्या आहेत. जिल्हयाच्या दक्षिण भागात दूधगंगा ही प्रमुख नदी असून वेदगंगा ही तीची उपनदी आहे. पंचगंगा नदी नृसिंहवाडीजवळ व दूधगंगा नदी जिल्हा सीमेबाहेर थोडयाच अंतरावर कृष्णा नदीस मिळतात. तिलारी ही दक्षिणेकडील एकच नदी पश्चिम वाहीनी नदी आहे.

७) पर्जजन्य व हवामान :-

जिल्हयाच्या पश्चिमेकडील सहयाद्री पर्वतरांगामध्ये दाट झाडी असून तेथे पर्जन्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे तेथील हवामान थंड आहे. पश्यिमेकडून पूर्वेकडे पर्जन्याचे प्रश्माण कमी-कमी होत जाते. त्यामुळे पश्चिमेकडील गगनबावडा, राधानगरी, चंदगड, व आजरा या तालुक्यात पर्जन्यमान जास्त तर पुर्वेकडील शिरोळ व हातकणंगले तालुक्यात पर्जन्यमान कमी आढळते. सन २००४ मध्ये सर्वात जास्त म्हणजेच ५४७९ मि.मी. गगनबावडा तालुक्यात तर सर्वात कमी ६१७ मि.मी. पाऊस शिरोळ तालुक्यात झाला आहे.

८) वनस्पती :-

जिल्हयात मुख्यतः पश्चिमेकडील जास्त पावसाच्या भागात हिरडा, ऐन, जांभूळ, दालचिनी, साग, इत्यादि कमी उंचीवरील परंतु जास्त पावसाच्या प्रदेशात चंदन, सिसव, किंजल, पानबाभूळ, खैर, बांबू इत्यादि व पूर्वेकडील कमी पावसाच्या प्रदेशात बाभळी, बोरी व तडवळ सारखी खुरटी व काटेरी झुडपे व गवत आढळते. त्याचप्रमाणे जिल्हयात कुयडा, वाकेरे, भरंग, सातवी, धावरी, बिबा, वाव्हा, भुईकोहला इत्यादी औषधी वनस्पती आढळतात.

सन २००४-२००५ मध्ये जिल्हयात १७४२ चौ.कि.मी. वनक्षेत्र असून त्यापैकी ६३३ चौ.कि.मी. राखीव व ४१७ चौ.कि.मी. संरक्षित उर्वरित ६९२ चौ.कि.मी. हे अवर्गीकृत वनक्षेत्र आहे. जिल्हयातील वनक्षेत्राची एकूण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी २२ टक्के इतकी येते. संदर्भ वर्षात वन व गौणवन उत्पादनापासून रुपये ९०.९३ लाख इतके उत्पन्न मिळाले आहे.

९) लोकसंख्या :-

जिल्हयाची सन च्या जनगणनेप्रमाणे लोकसंख्या ३५.२३ लाख इतकी आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जिल्हयाचा महाराष्ट्र राज्यात ९ वा क्रमांक लागतो. जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी सर्वात जास्त लोकसंख्या २६ टक्के करवीर या तालुक्यात तर सर्वात कमी १ टक्के गगनबावडा तालुक्यात आहे.

१०) लोकसंख्या वाढीचा वेग :-

सन १९९१ ते २००१ या दशकातील लोकसंख्या वाढीचा वेग सुमारे १७.८५ इतका होता. ग्रामीण व नागरी भागात हे प्रमाण अनुक्रमे १२.२७ व ३३.४६ इतके होते. सन १९८१ ते १९९१ या दशकातील दशवार्षिक वाढीच्या तुलनेत चालू दशकातील वाढीचा वेग कमी दिसतो. त्या उलट नागरी भागात हा वेग वाढलेला दिसतो.

११) लोकसंख्येची घनता :-

सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची लोकसंख्या दर चौ.कि.मी. मागे ४५५ इतकी असून ग्रामीण भागात ३३० तर नागरी भागात ४२२२ इतकी आहे. लोकसंख्येच्या घनतेमध्ये जिल्हयाच्या राज्यात तिसरा क्रमांक लागतो. लोकसंख्येची घनता सर्वात जास्त करवीर तालुक्यात (१३५१) तर सर्वात कमी घनता (११६) गगनबावडा तालुक्यात आहे.

१२) ग्रामीण व नागररी लोकसंख्या :-

सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाच्या एकूण ३५.२३ लाख लोकसंख्येपैकी २४.७३ लाख (७० टक्के) ग्रामीण तर १०.५० लाख (३० टक्के) नागरी लोकसंख्या आहे.

१३) स्त्रि पुरुष प्रमाण :-

२००१ च्या जनगणनेप्रमाणे दर हजार पुरुषाप्रमाणे स्त्रियांचे प्रमाण ९४९ इतके आहे. नागरी व ग्रामीण भागात हे प्रमाणे अनुक्रमे ९१९ व ९६२ इतके आहे.

१४) अनु.जाती/जमातीचे प्रमाण :-

२००१ च्या जनगणनेप्रमाणे अनु.जातीची लोकसंख्या ४.५० लाख असून ती एकूण लोकसंख्येच्या १३ टक्के इतकी आहे. ग्रामीण भागात सदरचे प्रमाणे १३ टक्के व नागरी भागात ११ टक्के इतके आहे. जिल्हयात अनु.जमातीची लोकसंख्या सुमारे ०.२१ लाख इतकी असून ती एकूण लोकसंख्येच्या १ टक्क्याहून कमी आहे.

१५) साक्षरतेचे प्रमाण :-

२००१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयाचे साक्षरतेचे प्रमाणे ७७ टक्के असून ग्रामीण व नागरी भागात हेच प्रमाण अनुक्रमे ७३ टक्के व ८६ टक्के इतके आहे. साक्षरतेच्या बाबतीत जिल्हयांचा रातयात १४ वा क्रमांक लागतो.

२००१ च्या जनगणनेनुसार पुरुष व स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८७ टक्के व ६६ टक्के आहे. साक्षरतेचे प्रमाण करवीर तालुक्यात (८३ टक्के) सर्वात जास्त असून गगनबावडा तालुक्यात (६१ टक्के) सर्वात कमी आहे.

१६) <u>काम करणारे</u> :-

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी १६.५३ लाख (४७ टक्के) काम करणारी लोकसंख्या असून त्यापैकी १३.०४ लाख ग्रामीण भागातील व ३.४९ लाख नागरी भागातील आहे. एकूण कामक-यांपैकी ४० टक्के शेतकरी १६ टक्के शेतमजूर ३ टक्के घरगुती उद्योगातील कामकरी व उर्वरित ४१ टक्के इतर कामकरी आहेत. सिमांतिक कामकरी २.५८ लाख असून ते एकूण लोकसंख्याच्या ७ टक्के ४१ टक्के इतर कामकरी आहेत.

१७) <u>जमिनीचा वापर</u> :-

सन १९९८-९९ च्या आकडेवारीनुसार जिल्हयाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी १८ टक्के जंगलव्याप्त, १० टक्के शेतीस उपलब्ध नसलेले, १५ टक्के लागवड न केलेले व पडीक व निव्वळ कसलेले क्षेत्र ५६ टक्के इतके होते. एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी ७८ टक्के निव्वळ पेरलेले क्षेत्र व उर्वरित २२ टक्के दुबार पेरलेले क्षेत्र होते.

एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी सर्वात जास्त निव्वळ कसलेले क्षेत्र चंदगड तालुक्यात तर सर्वात कमी गगनबावडा तालुक्यात होते. दुबार पेरलेले क्षेत्र गडहिंग्लज तालुक्यात जास्त व चंदगड तालुक्यात सर्वात कमी होते.

१८) <u>सिंचनाच्या सोयी</u> :-

मोठे व मध्यम प्रकल्प जिल्हयात राधानगरी, तुळशी, दूधगंगा व वारणा हे चार मोठे पाटबंधारे प्रकल्प असून त्यांचे कोल्हापूर जिल्हयातील एकूण लाभक्षेत्र २२०४३४ हेक्टर आहे. वारणा पाटबंधारे प्रकल्पाखाली कोल्हापूर व सांगली जिल्हयातील लाभक्षेत्राचा समावेश आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर ओलीतीखाली येणारे क्षेत्र १२०४६७ हेक्टर असून सन २००४-२००५ मध्ये राधानगरी, तुळशी, दूधगंगा व वारणा प्रकल्पाखाली ५२८०० हेक्टर (बारमाही) व १७३३१ (हंगामी) क्षेत्र प्रत्यक्ष ओलीताखाली आले आहे. राधानगरी व तुळशी या प्रकल्पाची कामे पूर्ण झाली असून उर्वरित २ प्रकल्पाची कामे पूर्ण असून कालव्याचे काम प्रगतीपथावर आहेत. तसेच जिल्हयात कासारी, पाटगांव, कुंभी, कडवी, चित्री, चिकोत्रा, जंगमहट्टी, धामणी, जांभरे, घटप्रभा, हिरण्यकेशी व सर्फनाला हे १२ मध्यम पाटबंधारे प्रकल्पापैकी ३ पूर्ण असून उर्वरित प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे. सन २००४-२००५ मध्ये जिल्हयात विहीरीखेरीज लघुपाटबंधारे प्रकल्पाची कामे पूर्ण झाली आहेत.

१९) <u>पशुधन</u> :-

सन १९९७ च्या पशुगणनेनुसार जिल्हयात १२.८२ लाख इतके पशुधन होते. त्यापैकी गायी/बैल २९ टक्के म्हैस/रेडे ५१ टक्के मेंढया १४ टक्के, होत्या. दर चौ.कि.मी. क्षेत्रामागे पशुधन घनता १६५ इतकी होती.

सन १९९२ च्या पशुगणनेपेक्षा १९९७ च्या पशूगणनेमध्ये १३ टक्केने वाढ झालेली आहे. गाय/बैल पशुवर्गामध्ये २टक्के, म्हैस वर्ग पशुमध्ये १९ टक्के व शेळया/मेंढया ही वाढ १० टक्केंनी झाली आहे.

सन १९९७ च्या पशुगणनेनुसार कुक्कूट पक्षांची संख्या १५.८९ लाख असून १९९२ च्या गणनेपेक्षा १४ टक्के वाढलेली आहे.

२०) उद्योग :-

कोल्हापूर जिल्हा औद्योगिकदृष्टया प्रगत जिल्हा असून औद्योगिकरणात आवश्यक असलेल्या वाहतुक व दळणवळणाच्या सोयी उपलब्ध आहेत. जिल्हयात कोल्हापूर व इचलकरंजी येथे मोठयाप्रमाणावर औद्योगिकरण झाले आहे. इचलकरंजी ह कापड निर्मितीचे केंद्र असून कोल्हापूर येथे कृषी अवजारे, यंत्रमाक, हातमाग, कुटीर उद्योग कार्यरत आहेत. जिल्हयात शिरोली इचलकरंजी , जयसिंगपूर व कोल्हापूर शहरात उद्यमनगर येथे औद्योगिक वसाहती स्थापन झाल्या असून हुपरी येथे सोन्या-चांदीचे दागिने मोठयाप्रमाणात तयार करण्यात येत असल्याने तेथेही औद्योगिक वसाहत स्थापन केली आहे. जिल्हयात १८ सहकारी व १ खाजगी साखर कारखाना असे एकूण १९ साखर कारखाने कार्यरत असून २००४-२००५ मध्ये ६३.७४ लाख टन ऊसाचे गाळप करुन ७.७२ लाख मे. टन साखर उत्पादन झाले आहे. सन २००१ च्या वार्षिक उद्योग चालू कारखान्यातील कामगारांची संख्या ४७७५३ इतकी होती.

२१ ) वाहतूक व दळणवळण :-

सन २००४-२००५ अखेर जिल्हयात ४७.२५ एकूण रस्त्यांची लांबी (न.पा.हद्दीतील रस्त्यासह) ९०४१ कि.मी. होती. त्यापैकी डांबरी १६४७ कि.मी. खडीचा व २२७० कि.मी. इतर माल वापरुन तयार करण्यात आलेला होता. जिल्हयातील रेल्वे मार्गाची लांबी ३५.६७ कि.मी. असून ६ रेल्वे स्थानके आहेत.

## कोल्हापूर वन विभागातील उपलब्ध वनक्षेत्र

कोल्हापूर वन विभागात एकूण ११ (करवीर, गगनबावडा, पन्हाळा, मलकापूर, पेंडाखळे, राधानगरी, आजरा, चंदगड, पाटणे, गारगोटी व कडगाव) वन परिक्षेत्र असून तालुका निहाय विभागणी झालेल्या वनक्षेत्राचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(क्षेत्र हेक्टर)

| तालुका | एकूण भौगोलिक क्षेत्र | गावांची संख्या | राखीव | सरक्षीत | अवर्गीकृत | संपादित | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| करवीर | ६७११३ | २६ | ९१२.९५ | १२५४.१५ | २८७.५४ | ० | २४५४.६४ |
| हातकणंगले | ६०९३७ | १६ | ६८५.७६ | १४०६.४९ | ० | ० | २०९२.२५ |
| कागल | ५४७५४ | २२ | २२६.७४ | १०४५.९७ | ७२.३८ | २९२.४० | १६३७.४९ |
| शिरोळ | ५०७८३ | ५ | ६७९.६३ | २१८.०७ | ० | ० | ८९७.७० |
| चंदगड | ९६५४२ | ४६ | २६०४६.६१ | १८५.१९ | २९६४.५० | ० | २८३९६.३० |
| आजरा | ५४८८८ | ५९ | १०८९०.०४ | ४७००.६१ | १३४.५१ | ८४.४६ | १५८०९.६२ |
| गडहिंग्लज | ४८११५ | २७ | ९५१.५९ | १३१२.९५ | ० | २८६.२० | १७५०.७४ |
| भुदरगड | ६४४४६ | ८६ | १६१५२.०५ | ६४९७.०२ | ३८.३३ | २५८४.३८ | २५२७१.९८ |
| राधानगरी | ८९२३२ | ४४ | ३७९९.१३ | ३०६३.०६ | १४१.८१ | ० | ६९९६.०० |
| गगनबावडा | २८२२८ | ३१ | ४३१०.०५ | ५८४८.५१ | ७८३.३५ | ४३२.८७ | ११३७४.७८ |
| पन्हाळा | ५६८७१ | ६२ | १०१०८.५९ | २५१०.३८ | ३०८.६२ | ४६.५२ | १२९७४.११ |
| शाहूवाडी | १०४३५२ | ११६ | २०३१०.०६ | ५३८७.२५ | ११९८.८६ | २४१७.१२ | २९३९३.२९ |
| एकूण | ७७६२६१ | ५४० | ९४२६५.२० | ३३४२९.६५ | ५१२९.९ | ६९४३.९५ | १३८९६८.९० |

### कोल्हापूर जिल्हयाचे वनक्षेत्र

| | |
|---|---|
| कोल्हापूर वन विभागाचे क्षेत्र | १३८९६८.९० |
| वन्यजीव विभागाचे क्षेत्र | ३५१४२.८० |
| महसूल विभागाकडील वनक्षेत्र | ३००.२० |
| वनसंज्ञेंतर्गत खासगी मालकी क्षेत्र | १३६६४.०० |
| एकूण | १८८०७५.९ |

### प्रस्तावित वनक्षेत्र

वरीलप्रमाणे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २४.२२% वनक्षेत्र आहे. म्हणजे ८% क्षेत्र वनाखाली आणणे जरुर आहे. उपलब्ध पडित जमिनीचा विचार करता ४०००० हेक्टर पडित जमिन वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध होऊ शकेल. तसेच शेतबांधावर, पडित कृषिक्षेत्रावर लागवडीसाठी २०००० हेक्टर क्षेत्र व रस्तादुर्तफा २८७३ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणता येईल. त्यामुळे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३% क्षेत्र वनाखाली येईल.

तसेच कोल्हापूर जिल्हयाच्या वनक्षेत्रामध्ये ४% पेक्षा कमी घनता असलेल्या २५००० हेक्टर क्षेत्रावर वनीकरण करुन वनांची घनता वाढवून वृक्षवाढ करणे शक्य आहे. सर्व विभागाच्या सहकार्याने वन विभाग ३३ % क्षेत्र वनाखाली आणण्याचे काम वन विभाग करत आहे.

Model Estimate

## महाराष्ट्र राज्य वनधोरण २००८

## कोल्हापूर जिल्हा कृती नियोजन आराखडा (२००९-१० ते २०१६-१७)

| अ.क्र | लागवड प्रकार | समाविष्ट क्षेत्राचा तपशिल | प्रस्तावित क्षेत्र हे. | आवश्यक रक्कम | कार्यान्वयीन यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|
| १ | गटलागवड | गायरान, मुलकीपड. | ५००० | ७३२६.२ | सा.वनीकरण विभाग |
| २ | पट्टरोपवन | रस्ता दुतर्फा | २८७३ | २०८७.९२ | सा.वनीकरण विभाग |
| ३ | खाजगी क्षेत्रावर लागवड | अनुत्पादित खाजगी मालकांचे पडीक क्षेत्र | ३५००० | १६२८३.३० | सा.वनीकरण विभाग |
| ४ | शेतबांधावर लागवड | खाजगी मालकांचे वहितीखालील क्षेत्र | २०,००० | ११८० | सा.वनीकरण विभाग |
| ५ | पडित वनक्षेत्रावर वृक्षलागवड | वनविभागाच्या अखत्यारितील क्षेत्र | २०,००० | १३७५० | वन विभाग |
| | | एकूण | ८२८७३ | ३६५२६.६१ | |

# कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर

प्रपत्र - अ

वनी करणासाठी उपलब्ध : क्षेत्र हेक्टर

| अ.क्र. | वनीकरणासाठी उपलब्ध क्षेत्राचा तपशील | वनीकरणास उपलब्ध होणारे संभाव्यतालुका निहाय क्षेत्र हेक्टर | | | | | | | | | | | | एकूण क्षेत्र हे. | क्षेत्राची मालकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | करवीर | हातकणंगले | शिरोळ | पन्हाळा | शाहूवाडी | गगनबावडा | राधानगरी | भुदरगड | गडहिंग्लज | आजरा | चंदगड | कागल | | |
| १ | गायरान | १५० | ३० | ० | ३०० | ४०० | ० | २०० | ० | १० | ५० | ८२० | ४० | २००० | ग्रामपंचायत/ महाराष्ट्र शासन |
| २ | फुलकीपड | ० | ० | ० | ० | ३०० | ० | ३०० | ० | ० | ५० | २३५० | ० | ३००० | महसूलखाते/ महाराष्ट्र शासन |
| ३ | खाजगी | ७००० | ३००० | ३००० | २९०० | १६०० | २०० | ११०० | ११०० | १५०० | ८०० | १३८०० | २०० | ३५००० | खाजगी मालकी |
| ४ | रस्ता दुतर्फा कि.मी. | ४०० | २०० | १५० | ७४८ | ४६५ | ५० | १०० | २०० | २०० | १०० | ३०० | २०० | २८७३ | सा.बा.विभाग कोल्हापूर |
| ५ | शेत बांधावरील | २००० | २००० | २००० | २००० | २००० | १००० | १००० | २००० | २००० | १००० | १००० | २००० | २०००० | वैयक्तिक लाभार्थी |
| ६ | पडीक वनक्षेत्र | ० | ४०० | ० | ४००० | ५००० | १५०० | १००० | ५००० | ० | ३००० | ५००० | १०० | २५००० | वन विभाग |
| | एकूण | ९५५० | ५६३० | ५१५० | ९९४८ | ९७६५ | २७५० | ३७०० | ८३०० | ३७१० | ५००० | २२८७० | २५४० | ८७८७३ | |

कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर

प्रपत्र - ब

प्रस्तावित वनीकरणाचे प्रकार निहाय विगतवारी (Type of Plantation) ( वनेत्तर क्षेत्र)

जिल्हा - कोल्हापूर

| अ.क्र. | वनीकरण कामाची विगतवारी | तालुका निहाय वनीकरणासाठी प्रस्तावित क्षेत्र हेक्टर/ कि.मी. मध्ये | | | | | | | | | | | | एकूण क्षेत्र हे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | करवीर | हातकणंगले | शिरोळ | पन्हाळा | शाहूवाडी | गगनबावडा | राधानगरी | भुदरगड | गडहिंग्लज | आजरा | चंदगड | कागल | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | Bloc Plantation | १५० | ३० | - | ३०० | १०० | - | ४०० | - | १० | १०० | ३१७० | ४० | ५००० |
| २ | Agrisilvicultural Plantation | ६००० | ४००० | ४००० | ३९०० | ३६०० | १२०० | २१०० | ३१०० | ३५०० | १८०० | १४८०० | २२०० | ५५००० |
| ३ | Linear Plantation | ४०० | २०० | १५० | ४९८ | ४७५ | ५० | १०० | २०० | २०० | १०० | ३०० | २०० | २८७३ |
| | Total | ६५५० | ४२३० | ४१५० | ४६९८ | ४१७५ | १२५० | २६०० | ३३०० | ३७१० | २००० | १८२७० | २४४० | ६२८७३ |

९२

प्रपत्र - क

वृक्षलागवडीसाठी अंदाजित खर्च (Anticipated Cost)

| अ.क्र. | तालुका | गायरान क्षेत्रावर वृक्षलागवड | | मुलकी पड क्षेत्रावर वृक्षलागवड | | रस्ता दुतर्फा वृक्षलागवड | | खाजगी पडीक क्षेत्रावर वृक्षलागवड | | शेत बांधावरील वृक्षलागवड | | पडित क्षेत्र | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | रक्कम लाखात | क्षेत्र | रक्कम लाखात | क्षेत्र | रक्कम लाखात | क्षेत्र | रक्कम लाखात | क्षेत्र | रक्कम लाखात | क्षेत्र | रक्कम लाखात | क्षेत्र | रक्कम लाखात |
| १ | करवीर | १५० | ६९.७९ | ० | ०.०० | ४०० | ४१६.०० | ७००० | ३२५६.६८ | २००० | ११८.०० | ० | ०.०० | ९५५० | ३८६०.४७ |
| २ | हातकणंगले | ३० | १३.९६ | ० | ०.०० | २०० | २०८.०० | ३००० | १३९५.७२ | २००० | ११८.०० | ४०० | २२०.०० | ५६३० | १९५५.६८ |
| ३ | शिरोळ | ० | ०.०० | ० | ०.०० | १५० | १५६.०० | ३००० | १३९५.७२ | २००० | ११८.०० | ० | ०.०० | ५१५० | १६६९.७२ |
| ४ | पन्हाळा | ३०० | १३९.५७ | ० | ०.०० | ४९८ | ५१७.९२ | २१०० | ९७७.०० | २००० | ११८.०० | ४००० | २२००.०० | ८८२८ | ३९५२.४९ |
| ५ | शाहूवाडी | ४०० | १८६.१० | ३०० | १३९.५७ | ४७५ | ४९४.०० | १६०० | ७४६.३८ | २००० | ११८.०० | ५००० | २७५०.०० | ९७७५ | ४४३२.०५ |
| ६ | गगनबावडा | ० | ०.०० | ० | ०.०० | ५० | ५२.०० | २०० | ९३.०५ | १००० | ५९.०० | १५०० | ८२५.०० | २७५० | १०२९.०५ |
| ७ | राधानगरी | २०० | ९३.०५ | ३०० | १३९.५७ | १०० | १०४.०० | ११०० | ५११.७६ | १००० | ५९.०० | १००० | ५५०.०० | ३७०० | १४५७.३८ |
| ८ | भुदरगड | ० | ०.०० | ० | ०.०० | २०० | २०८.०० | ११०० | ५११.७६ | २००० | ११८.०० | ५००० | २७५०.०० | ८३०० | ३५८७.७६ |
| ९ | गडहिंग्लज | १० | ४.६५ | ० | ०.०० | २०० | २०८.०० | १५०० | ६९७.८६ | २००० | ११८.०० | ० | ०.०० | ३७१० | १०२८.५१ |
| १० | आजरा | ५० | २३.२६ | ५० | २३.२६ | १०० | १०४.०० | ८०० | ३७२.१९ | १००० | ५९.०० | ३००० | १६५०.०० | ५००० | २२३१.७१ |
| ११ | चंदगड | ८२० | ३८१.५० | २३५० | १०९३.३१ | ३०० | ३१२.०० | १३४०० | ६२३४.२२ | १००० | ५९.०० | ५००० | २७५०.०० | २२८७० | १०८३०.०३ |
| १२ | कागल | ४० | १८.६१ | ० | ०.०० | २०० | २०८.०० | २०० | ९३.०५ | २००० | ११८.०० | १०० | ५५.०० | २५४० | ४९२.६६ |
| | एकुण | २००० | ९३०.४९ | ३००० | १३९५.७१ | २८७३ | २९८७.९२ | ३५००० | १६२८३.३९ | २०००० | ११८०.०० | २५००० | १३७५०.०० | ८७८७३ | ३६५२७.५१ |

Model Estimate उ

प्रपत्र ३

कार्य करणारी यंत्रणा (Implementing Agency) (क्षेत्र हे.)

| गावचे नांव | गावाचा कोड | वनीकरणाकरीता प्रस्तावित क्षेत्र | यंत्रणेचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| - | - | वन क्षेत्र | उपवनसंरक्षक, कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर | |
| - | - | खाजगी व मुलकी पडिक क्षेत्र | उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर | |
| - | - | कृषी क्षेत्र, बांधावरील लागवड | वैयक्तिक लाभार्थी | |
| - | - | रस्ता दुतर्फा लागवड | सा.बा.वि. | |
| - | - | खाजगी पडीक क्षेत्र | वैयक्तिक लाभार्थी | |

## विवरणपत्र- १.

### उपवनसंरक्षक कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर हयांचे कार्यालय

### जिल्हयातील खाजगी पडीक जमिन वृक्षलागवड करुन वृक्षाच्छादित करणेसाठी आवश्यक अनुदान

रक्कम रु. लाखात

अ .. गट लागवड

| अ.क्र. | कामाचे वर्ष | मापदंडा नुसार हे. रक्कम | २००९-१० | | २०१०-२०११ | | २०११-२०१२ | | २०१२-२०१३ | | २०१३-२०१४ | | २०१४-२०१५ | | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | पूर्व पावसाळी कामे | ०.२४ | ८००० | १९२० | ८००० | १९२० | ८००० | १९२० | ८००० | १९२० | ८००० | १९२० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४०००० | ९६०० |
| २ | प्रथम वर्ष कामे | ०.१६ | ० | ० | ८००० | १०४० | ८००० | १०४० | ८००० | १०४० | ८००० | १०४० | ८००० | १०४० | ० | ० | ० | ० | ४०००० | ५२०० |
| ३ | द्वितीय वर्ष कामे | ०.०८ | ० | ० | ० | ० | ८००० | ६४० | ८००० | ६४० | ८००० | ६४० | ८००० | ६४० | ८००० | ६४० | ० | ० | ४०००० | ३२०० |
| ४ | तृतीय वर्ष कामे | ०.०४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ८००० | १६० | ८००० | १६० | ८००० | १६० | ८००० | १६० | ८००० | १६० | ४०००० | ८०० |
| ५ | एकूण | | ८००० | १९२० | १६००० | २९६० | २४००० | ३६०० | ३२००० | ३७६० | ३२००० | ३७६० | २४००० | १८४० | १६००० | ८०० | ८००० | १६० | ० | १८८०० |

## विवरणपत्र-२

ब रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड

| अ.क्र. | कामाचे वर्ष | मापदंडा नुसार हे. रक्कम | २००९-१० | | २०१०-२०११ | | २०११-२०१२ | | २०१२-२०१३ | | २०१३-२०१४ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| | कालवधी १५ महिने | ० | ० | ० | | | | | | | | | | |
| १ | प्रथम वर्ष कामे | ०.९४ | ० | ० | ८०० | ७५२ | १००० | ९४० | १०७३ | १००९ | ० | ० | २८७३ | २७०१ |
| १ | द्वितीय वर्ष कामे | ०.१ | ० | ० | ० | ० | ८०० | ८० | १००० | १०० | १०७३ | १०७ | २८७३ | २८७.३ |
| २ | एकूण | | ० | ० | ८०० | ७५२ | १८०० | १०२० | २०७३ | ११०९ | १०७३ | १०७ | ५७४६ | २९८८ |

९५

2

# विवरणपत्र-३

क पडित वनक्षेत्रावर वनीकरण

| अ.क्र. | कामाचे वर्ष | मापदंडानुसार हे. रक्कम | २००९-१० | | २०१०-२०११ | | २०११-२०१२ | | २०१२-२०१३ | | २०१३-२०१४ | | २०१४-२०१५ | | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | पूर्व पावसाळी कामे | ०.२४ | ५००० | १२०० | ५००० | १२०० | ५००० | १२०० | ५००० | १२०० | ५००० | १२०० | ० | ० | ० | ० | ० | ० | २५००० | ६००० |
| २ | प्रथम वर्ष कामे | ०.१९ | ० | ० | ५००० | ९५० | ५००० | ९५० | ५००० | ९५० | ५००० | ९५० | ५००० | ९५० | ० | ० | ० | ० | २५००० | ४७५० |
| ३ | द्वितीय वर्ष कामे | ०.०६ | ० | ० | ० | ० | ५००० | ३०० | ५००० | ३०० | ५००० | ३०० | ५००० | ३०० | ५००० | ३०० | ० | ० | २५००० | १५०० |
| ४ | तृतीय वर्ष कामे | ०.०३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ५००० | १५० | ५००० | १५० | ५००० | १५० | ५००० | १५० | ५००० | १५० | २५००० | ७५० |
| ५ | चतुर्थ वर्ष | ०.०१६ | | | | | | | | | ५००० | ८० | ५००० | ८० | ५००० | ८० | ५००० | ८० | २०००० | ३२० |
| ६ | पंचम वर्ष | ०.०१६ | | | | | | | | | | | ५००० | ८० | ५००० | ८० | ५००० | ८० | १५००० | २४० |
| | एकूण | | | | | | | | | | | | | | | | | | | १३५६० |

# विवरणपत्र-४

शेतबांधावरील वृक्ष लागवड

| अ.क्र. | कामाचे वर्ष | मापदंडानुसार हे. रक्कम | २००९-१० | | २०१०-२०११ | | २०११-२०१२ | | २०१२-२०१३ | | २०१३-२०१४ | | २०१४-२०१५ | | २०१५-२०१६ | | २०१६-२०१७ | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | पूर्व पावसाळी कामे | ०.००७ | ४००० | २८ | ४००० | २८ | ४००० | २८ | ४००० | २८ | ४००० | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | २०००० | १४० |
| २ | प्रथम वर्ष कामे | ०.०३ | ० | ० | ४००० | १२० | ४००० | १२० | ४००० | १२० | ४००० | १२० | ४००० | १२० | ० | ० | ० | ० | २०००० | ६०० |
| ३ | द्वितीय वर्ष कामे | ०.०२ | ० | ० | ० | ० | ४००० | ८० | ४००० | ८० | ४००० | ८० | ४००० | ८० | ४००० | ८० | ० | ० | २०००० | ४०० |
| ४ | तृतीय वर्ष कामे | ०.००२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४००० | ८ | ४००० | ८ | ४००० | ८ | ४००० | ८ | ४००० | ८ | २०००० | ४० |
| ५ | एकूण | | ४००० | २८ | ८००० | १४८ | १२००० | २२८ | १६,००० | २३६ | १६,००० | २३६ | १२००० | २०८ | ८००० | ८८ | ४००० | ८ | ० | ११८० |

Model Estimate

अपेक्षित दैनंदिन मजूरी रु.१०५

अ) गट लागवड - नमूना दरपत्रक - १

प्र.हे. ९०० रोपे

| अ.क्र. | कामाचे वर्ष | प्र.हे.खर्चाचा मापदंड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म.दि. | मजूरी | साहित्य | एकूण | ६% मजूर कल्याण व आकस्मिक | एकूण | पूर्णांकात |
| १ | पूर्व पावसाळी | २०९.३२ | ०.०० | २४९ | २४९.०० | १४.९४ | २६३.९४ | २३५६१ |
| २ | प्रथम वर्ष | १०८.१० | ०.०० | ८५१ | ८५१.०० | ५१.०६ | ९०२.०६ | १२९३४ |
| ३ | व्दितीय वर्ष | ७०.९४ | ०.०० | १२३ | १२३.०० | ७.३८ | १३०.३८ | ८०२६ |
| ४ | तृतीय वर्ष | १८.०० | ०.०० | ० | ०.०० | ०.०० | ०.०० | २००३ |
| ५ | एकूण | ४०६.३६ | ०.०० | १२२३.०० | १२२३.०० | ७३.३८ | १२९६.३८ | ४६५२४ |

अपेक्षित दै.दर रु. १०५

रस्ता दुतर्फा लागवड - नमूना दरपत्रक - २

प्र.कि.मी. १००० रोपे

| अ.क्र. | कामाचे वर्ष | प्र. कि. मी. खर्चाचा मापदंड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | म.दि. | मजूरी | साहित्य | एकूण | ६% मजूर कल्याण व आकस्मिक | एकूण | पूर्णांकात |
| | कालावधी १५ महिने | | | | | | | |
| १ | प्रथम वर्ष एप्रिल ते मार्च | ८३१.४ | ८७२९७.०० | ९४२.० | ८८२३९.०० | ५२९४.३४ | ९३५३३.३४ | ९३५३३ |
| २ | व्दितीय वर्ष एप्रिल ते जून | ८७.० | ९१३५.०० | ० | ९१३५.०० | ५४८.१ | ९६८३.१० | ९६८३ |
| | एकूण | ९१८.४ | ९६४३२.०० | ९४२.० | ९७३७४.०० | ५८४२.४४ | १०३२१६.४ | १०३२१६ |